महाराष्ट्र औद्योगिक वसाहत व सावित्री नदी/खाडी प्रदुषणाबाबत स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती समन्वय दिनांक ०१/१०/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत खालील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते त्याची सविस्तर इतिवृत्त खालीलप्रमाणे.

| अ.नं. | अधिकारी/कर्मचा-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| | २ | ३ |
| १ | श्रीम. प्रियांका कांबळे | तहसिलदार महाड |
| २ | श्री. रा.ऊ पाटील | उप प्रादेशिक अधिकारी (म.प्र.नि.मंडळ महाड) |
| ३ | श्री. सुधीर वामन गोगटे | कृषी अधिकारी |
| ४ | श्री. एस.बी. पठारे | व्हा.चेअरमन CETP |
| ५ | श्री. सुरेश भोसले | चेअरमन MMACETP |
| ६ | श्री. जगन्नाथ वि. कांगणे | उपअभियंताMIDC |
| ७ | श्री. माधव बागडे | कमेटी सदस्य |
| ८ | श्री. सुर्यकांत मा. धायकुडे | आरोग्य सहाय्यक |
| ९ | डॉ. सुधीर पटवर्धन | NGO |
| १० | श्री.एस.एस.जगताप | A.P.I. Mahad MIDC |
| ११ | श्री.दर्शन वि.म्हात्रे | क्षेत्र अधिकारी (म.प्र.नि.मंडळ महाड) |
| १२ | श्री. गजानन पवार | क्षेत्र अधिकारी (म.प्र.नि.मंडळ महाड) |

REGIONAL OFFICE 1726 02/10/13

प्रथम सभेस अध्यक्ष मा. उपविभागीय अधिकारी महाड हे कार्यालयीन कामासाठी मुंबई येथे गेले असल्याने त्यांचे आदेशावरुन तहसिलदार महाड यांनी सभेचे अध्यक्षस्थान घेऊन सर्व उपस्थितांचे आभार मानून सभेस सुरवात करण्यात आली. त्यामध्ये खालील मुद्दावर चर्चा करण्यात आली

| अ.नं | विषयाचे नाव | विषयाचे निराकरण व करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | तहसिलदार यांनी त्यांच्याकडे आलेल्या श्री. चोपडे यांच्या शेडाव डोहच्या पाणी प्रदुषणाबाबत प्रश्न उपस्थित केला | उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ महाड यांनी सांगितले की ही तक्रार आज प्राप्त झाली असून त्याबाबत पाण्याचे नमुने घेऊन शहानिशा करणेत येईल. तसेच प्रत्येक महिन्याला या कार्यालयाकडून NWMP या अंतर्गत शेडाव डोहचे पाण्याचे नमुने घेतले जातात. |
| २ | एमआयडीसीमधून सोडण्यात येणा-या रासायनिक पाण्यामुळे होणा-या नदी नाले व पिण्याच्या पाण्याच्या प्रदुषणाबाबत | उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि मंडळ महाड यांनी सांगितले की, मे. कॅप्रोलॅक्टम केमिकल लिमिटेड या कारखान्याद्वारे प्रदुषीत काळसर पाणी टेमघर नाल्यामध्ये सोडल्यामुळे संबंधीत कंपनीला नोटीस देऊन पुढील कारवाईसाठी प्रादेशिक अधिकारी रायगड यांचेकडे पाठवित आहे. |
| ३ | डॉ पटवर्धन यांनी उपस्थित केलेल्या महाड एमआडीसी कारखान्याकडून होणा-या हेवेचे प्रदुषण व नागरीकांना होणारा श्वास व दम्याच्या त्रासाबाबत तसेच महाड हा Major chemical zone असल्यामुळे VOC मोजण्यात यावा याबाबत सूचना केली. | उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ महाड यांनी याबद्दल या कार्यालयाकडून तक्रारीच्या अनुषंगाने दिवस रात्र पहाणी केली जाते व संबंधीत कारखान्यावर कारवाई केली जाईल तसेच येणा-या तक्रारींची दखल घेतली जाते. तसेच सदरील हवेचे प्रदुषण हे एमआडीसी बाहेरील जागेवर ग्रामपंचायत हद्दीतील भंगार गोळा करणारे भंगारवाले अनाधिकृतपणे काही भंगार जाळतात व त्यामुळे होणा-या हवेतील प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी एमआयडीसी शेजारील सर्व ग्रामपंचायतींना या कार्यालयाकडून पत्रव्यवहार करुन अशा अनाधिकृत भंगारवाल्यांना सदरील ग्रामपंचायतींनी नाहरकत परवाना देवू नये व त्यांच्यावर कारवाई करावी असे सुचित केल्याबद्दल सांगितले आहे. तसेच श्री. जगताप यांनी देखील MIDC पोलीस व उप प्रादेशिक महाराष्ट्र प्रदुषण मंडळातील अधिकारी यांनी संयुक्त पथक तयार करुन सुटीच्या दिवशी तसेच रात्रीच्या वेळी MIDC परिसरात अनाधिकृत भंगार जाळणा-या लोंकावर कारवाई केली जाईल असे सांगितले. तसेच VOC बाबत म.प्र.नि. मंडळाकडून वरिष्ठ कार्यालयात पत्रव्यवहार केला जाईल असे सांगितले. |
| ४ | डॉ पटवर्धन यांनी उपस्थित केलेला विनंती ऑरगॅनिक या कंपनीसमोरील रोडवरील टॅंकरद्वारे होणा-या ट्रॅफीकमुळे होणारा त्रास. | यावर उपाय म्हणून श्री. सुरेश भोसले यांनी सांगितले की एमआयडीसीने कंपन्यांची अवजड वाहने उभी करणेसाठी एक सुसज्ज वाहनतळ उभारले गेले पाहिजे व त्याबद्दल एमआडीसीचे अधिकारी श्री. कांगणे यांना विचारल्यावर श्री. कांगणे यांनी सांगितले की BOT तत्वावर पातळगंगा वाहनतळाच्या प्रमाणे महाड एमआयडीसी वाहनतळाच्या उभारणी बद्दल विचाराधीन असून येथून आपल्या |

| | | |
|---|---|---|
| | | स्तरावर एम.एम.ए. च्या अधिका-यांना घेऊन पाताळगंगेच्या वाहनतळाला लवकरच भेट दिली जाईल. |
| ५ | डॉ पटवर्धन यांनी सी.ई.टी.पी प्रक्रीयायुक्त पाणी परत शेतीसाठी वापरण्याच्या प्रस्तावाबद्दल विचारणा केली | श्री. भोसले चेअरमन सीईटीपी हे म्हणाले की एमआयडीसीने सीईटीपीला जागा उपलब्ध करुन दयावी म्हणजे BAIF च्या संयुक्त विदयमाने सीईटीपी MIDC मध्ये बागबगीचा व शेती करण्यास तयार आहे असे सांगितले. |
| ६ | श्री. सुरेश भोसले चेअरमन सीईटीपी ह्यांनी कारखान्यांतून निघणा-या E-WASTE व भंगारबद्दल जागा उपलब्ध करणेबाबत. | E-WASTE व भंगारसाठी एमआडीसीने जागा उपलब्ध करुन देवून तेथे सर्व कचरा एकत्र गोळा करणेसाठी सुचना करणेत आली. |
| ७ | डॉ पटवर्धन यांनी टेमघर नाल्यावर पक्का कॉंक्रीटचा बंधारा बांधणेसाठीचा प्रश्न उपस्थित केला | श्री. कांगणे एमआडीसीचे अधिकारी यांनी सांगितले की त्याबद्दलचे टेंडर लवकरच काढले जातील. |
| ८ | डॉ. पटवर्धन यांनी खाडी किना-याच्या लोकांना कॅन्सर झाल्याबद्दल व त्यांच्या सर्वे बद्दल प्रश्न उपस्थित केला | आरोग्य विभागाचे प्रतिनिधी श्री. धायगुडे म्हणाले की असा सर्वे त्यांच्या विभागाकडून करणेंत आला परंतु त्यामध्ये कॅन्सर रुग्ण आढळले नाहीत. त्यावर पटवर्धन म्हणाले की, सविस्तर सर्वे परत केला पाहीजे. |
| ९ | सीईटीपी चेअरमन श्री. भोसले व डॉ पटवर्धन यांनी विचारले की सांडपाणी वाहून नेणारी वाहीनी आंबेतपर्यंत नेणे व दुसरी Standby वाहीनी एमआडीसीने टाकणेबाबत | एमआयडीसी अधिकारी श्री. कांगणे यांनी सांगितले की. NIO कडे पुन्हा सदरील प्रकरणांत सर्वे करण्यासाठी सांगितले असून Pre-mansson सर्वे NIO कडून केला असून Post-Mansson सर्वे पुढील ६महिन्यात पुर्ण झाल्यावर NIO च्या निर्देशानुसार सांडपाणी सोडणेत येईल व दुस-या समांतर वाहीनीसाठी विचार केला जाईल. |
| १० | डॉ. पटवर्धन यांचेकडून हवा प्रदुषण तपासणी संयंत्रणेबाबत विचारणा केली गेली. (CAAQMS) | उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.नि मंडळ, महाड यांनी सांगितले की माहे जानेवारी २०१२ पर्यत डॉ बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी लोणेरे यांच्याकडून हवा प्रदुषण तपासणी चालू होती परंतु काही तांत्रिक कारणामुळे त्यांनी ही सेवा बंद केली आहे.व पुढे ती पुन्हा कार्यान्वीत करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर बोलणी चालू असून त्याबद्दल लवकरच निर्णय घेण्यात येईल. |
| ११ | MMA चे अध्यक्ष सुरेश भोसले व इतर सदस्य श्री. पाठारे यांनी हितकारी कंपनीच्या आवारातील dump केलेल्या waste-material उचलणे बाबत प्रश्न उपस्थित केला. | उप प्रादेशिक अधिकारी यांनी कंपनीला नोटीस देऊन त्याबाबत आवश्यक ती कारवाई केली जाईल असे सांगितले. |
| १२ | डॉ पटवर्धन यांनी आमशेत येथे Ram-K कंपनी मार्फत उभारण्यात येणा-या घनकचरा व्यवस्थापन प्रोजेक्ट चा प्रश्न असूनही मार्गी लागत नसल्याने त्याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी संबंधीत वरिष्ठ स्थरावरील अधिका-याची बैठक आयोजित करावी अशी सूचना केली | याबाबत मा. तहसिलदार यांनी उपविभागीय अधिका-यांशी चर्चा करुन सदर बैठक आयोजित करण्याविषयी नियोजन केले जाईल असे सांगितले. |
| १३ | महाड MMA ने नीरी ने दिलेल्या सूचनांवर अंमल करणे आवश्यक आहे असे डॉ. पटवर्धन यांनी म्हटले | त्याबाबत उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे Deputy Engineer श्री. कांगणे आणि MMA चे अध्यक्ष श्री. सुरेश भोसले व म.प्र.नि मंडळाचे श्री. पाटील यांनी सहमती दर्शविली. |
| १४ | MMA चे चेअरमन श्री. सुरेश भोसले यांनी मे. विसावा हेल्थ रिसॉर्ट महाड यांनी RRZ चे उल्लघंन केले किंवा कसे तसेच सदरील रिसॉर्ट ने घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी STP बसविला किंवा नाही याबद्दल चौकशी केली. | मा. तहसिलदार यांनी याबाबत चौकशी केली जाईल असे सांगितले. |

सदस्य सचिव तथा पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती

निमा उपप्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि. मंडळ,महाड

अध्यक्ष
पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती तथा
उपविभागीय अधिकारी
महाड विभाग महाड